स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रा.डॉ. गणेश भामे
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०-२५६२२६८८/८९
: ०२०-२५६२२६९०/९१
: ०२०-२५६२२६९२
: ०२०-२५६९७३४१

**संदर्भः रासेयो/२०२६-२७/२९९** **दि.१५/१०/२०२६**

**प्रति,**
**मा. प्राचार्य/संचालक**
**रासेयो संलग्नित व स्वायत्त महाविद्यालये व परिसंस्था,**
**पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.**

**विषय : विविध कार्यशाळा आयोजनाकरिता ऑनलाईन प्रस्ताव पाठविणे बाबत...**

महोदय,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दरवर्षी विविध विषयांवर आधारीत उपक्रमांचे आयोजन रासेयो संलग्न महाविद्यालयांमधून करण्यात येते. सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षामध्ये खालीलप्रमाणे विषयांवर आधारित कार्यशाळांकरिता खालीलप्रमाणे विषयांवर आधारीत एक/तीन दिवसीय कार्यशाळा/शिबिरे अयोजित करण्याकरिता महाविद्यालयांमार्फत प्रस्ताव मागविण्यात येत आहे.

**अ. मूल्यशिक्षण अंतर्गत कार्यशाळा (एक दिवसीय)** : १. पर्यावरण संवर्धन २. लिंगभाव संवेदनीकरण ३. महापुरूषांच्या विचारांमधून राष्ट्रनिर्मितीकडे ४. नशामुक्त युवा-सक्षम भारत

**ब. ऐतिहासीक स्थळे दत्तक योजना (एक दिवसीय)** : १. किल्ले संवर्धन २. ऐतिहासीक स्थळे संवर्धन

**क. युवक युवती उन्नयनीकरण कार्यक्रम (तीन दिवसीय)** : १. व्यक्तीमत्त्व विकास कार्यशाळा २. लोक-कला (लोकसंगीत, लोकनृत्य) ३. शेती व्यवस्थापन ४. सायबर गुन्हे आणि सुरक्षा.

**ड. रासेयो शिबिरांसाठी विद्यापीठ निधी (अर्थसहाय्य) (एक ते सात दिवसीय)** : स्थानिक गरजा लक्षात घेऊन विषयाची निवड करून विषय नमुद करावा

**इ. राष्ट्रीय सेवा योजना स्वयंनिर्वाही एकक (जमेपोटी) (एक ते सात दिवसीय)** : स्थानिक गरजा लक्षात घेऊन विषयाची निवड करून विषय नमुद करावा.

ज्या महाविद्यालयांना वरील उपक्रमांतर्गत कार्यशाळा/शिबिरे आयोजित करावयाची आहेत अशा महाविद्यालयांनी वरीलप्रमाणे उपक्रमांचे प्रस्ताव **www.bcud.unipune.ac.in ▸ login ▸ menu ▸ nss ▸ workshop Proposal** या लिंकवर ऑनलाईन स्वरूपात भरण्यात यावे. प्रस्ताव भरल्यानंतर त्याची प्रिंट काढून स्कॅन कॉपी पीडीएफ दि. **२४ ऑक्टोबर २०२६ पर्यंत** अपालोड करण्यात यावी.

सदर कार्यशाळांचे आयोजन १५ डिसेंबर २०२६ ते ३१ जानेवारी २०२७ दरम्यान करण्यात यावे. त्यानुसार प्रस्तावामध्ये तपशिल सादर करणे आवश्यक आहे आणि नमुद केलेल्या तपशिलाप्रमाणेच कार्यशाळांचे आयोजन करणे आवश्यक आहे. कळावे, ही विनंती.

*टिप :*

*१. प्रस्ताव अ. व ब. जिल्हास्तरीय, एकदिवशीय व कमाल १०० विद्यार्थी संख्या याप्रमाणे प्रस्ताव सादर करावे.*
*२. प्रस्ताव क. ड. व इ. विद्यापीठ/राज्य, तीन दिवशीय व कमाल १०० विद्यार्थी संख्या याप्रमाणे प्रस्ताव सादर करावे.*
*३. रासेयो नियमित कार्यक्रम प्रस्ताव भरल्यानंतरच आपणास कार्यशाळा प्रस्ताव भरता येईल.*
*४. महाविद्यालयांना वरीलप्रमाणे अ. ब. क. ड. व इ. पैकी जास्तीत जास्त दोन प्रस्ताव सादर करता येईल.*
*५. कार्यशाळा आयोजनाचे मंजुरीपत्र प्राप्त झाल्याशिवाय कार्यशाळेचे आयोजन करण्यात येऊ नये.*
***६. दि. ७ व ८ ऑक्टोबर २०२६ रोजी वार्षिक नियोजन बैठकीकरिता अनुपस्थित महाविद्यालयांना सदर प्रस्ताव सादर येणार नाही याची नोंद घ्यावी.***

Bhame.

**संचालक (अतिरिक्त कार्यभार)**
**राष्ट्रीय सेवा योजना**